College Code 117

National Conference

On

# Climate Change and It's Impact on Agriculture Development in India

ISBN: [illegible]


([illegible] 2019)

Indian Council of Social Science Research

Originized By

Department of Geography

Ujwal Gramin Mahavdyalaya, Ghonsi, Tq- Jalkot, Dist.Latur



Editor

Prin. Dr. Sadanand H. Gone

Dr. Devidas S. Kendre

Dr. Prakash K. Morkhande

Dr. Padmakar B. Gone

४७.

# बीदर जिल्ह्यातील अनुसूचित जाती-जमातीच्या लोकसंख्येचा : एक भौगोलिक विश्लेषण


संशोधक
नारायण हणमंतराव पांचाळ
भूगोल विभाग
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद
ता.मुखेड जि.नांदेड

मार्गदर्शक
प्रा.डॉ.वसंत तुकाराम नाईक
विभागप्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक
ग्रामीण महाविद्यालय, वसंतनगर (कोटग्याळ)
ता.मुखेड जि.नांदेड


**प्रस्तावना :**

भौगोलिक पर्यावरणाशी लोकसंख्येचे तिच्या गुणवैशिष्ट्यांसह होणारे समायोजन हे लोकसंख्येचे एक महत्त्वाचे अंग आहे. या प्रक्रियेत भौगोलिक परिस्थितीवर किंवा स्वरूपावर लोकसंख्येचाही प्रभाव पडतो. त्याचाही अभ्यास लोकसंख्या भूगोलात केला जातो. उदा.वाढत्या लोकसंख्येमुळे उत्पादन तंत्र, उत्पादन प्रमाण, यांत्रिकता इत्यादीमुळे शेती कारखानदारी यामुळे पर्यावरणही वाढता प्रभाव जाणवतो. ध्वनी प्रदूषण, मृदा प्रदूषण, अति जलसिंचनामुळे जमीनीचे क्षारीकरण, तापमानाची विपरितता अशा अनेक समस्यांचा विचार लोकसंख्या भूगोलात केला जातो. याचा विचार लोकसंख्या भूगोलाच्या आशयाशी आहे.

अनुसूचित जाती व जमाती या इतर समाजापासून भिन्न आहेत. भारतीय समाजातील अत्यंत मागासलेल्या समूहाची एक वेगळी ओळख म्हणून त्या लक्ष वेधतात. अनुसूचित जाती-जमातीमध्ये वांशिक पार्श्वभूमीच्या संदर्भात विभिन्नता आढळते. त्या जमातीचे लोक विभिन्न वांशिक, भाषिक व धार्मिक पंथाचे आहेत. विश्वास, श्रध्दा, समारंभ, उत्सव, आर्थिक कार्य, इ. बाबतीत विविधता आढळते. त्यांचे अस्तित्व पर्यावरणाशी निगडित आहे. प्रस्तुत शोधनिबधात अनुसूचित जाती-जमातीच्या लोकसंख्येचा अभ्यास करण्यात आला आहे.


**अभ्यास क्षेत्र :**

बिदर जिल्हा कर्नाटकातील महत्त्वाच्या जिल्ह्यापैकी एक जिल्हा आहे. या जिल्ह्यास आंध्र प्रदेश आणि तेलगणा राज्याचा काही भाग अशा सीमा लागून आहेत. तसेच महाराष्ट्रातील लातूर, उस्मानाबाद व नांदेड या जिल्ह्याच्या सीमावर्ती भागावर हा जिल्हा वसलेला आहे. बिदर जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७°३५' ते १८°२५' आणि रेखावृत्तीय विस्तार ७६°४२' ते ७७°३९' इतका





आहे. बिदर जिल्ह्याचे क्षेत्रफळ ५,४४८ एवढे आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार बिदर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १७०३३०० एवढी असून त्यापैकी अनुसूचित जाती (SC) २९८८१२ (१७.५४%) आणि अनुसूचित जमातींची (ST) ची १८२२१९ (१०.७९%) इतकी लोकसंख्या आहे. बिदर जिल्ह्यात एकूण ५ तालुके आहेत.




**माहिती संकलन :**

प्रस्तुत संशोधन प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या माहितीवर आधारित असून प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. दुय्यम स्वरूपाची माहिती मिळविण्यासाठी बिदर जिल्ह्याचा जनगणना अहवाल, बिदर जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन, कृषी अहवाल, विविध संशोधन पत्रिका, बिदर जिल्हा गॅझेटिअर, विविध संदर्भ ग्रंथ, शासकीय कार्यालयातील नोंदी, प्रकाशित व अप्रकाशित माहिती इत्यादींचा आधार घेतला जाणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

बिदर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचा अभ्यास करणे

**विषय विवेचन**

केवळ नैसर्गिक संपत्तीच नाही तर सर्वांगीण विकास करण्यासाठी लोकसंख्या हा घटक अत्यंत महत्त्वाचा असतो. बिदर जिल्ह्यातील अनुसूचित जाती जमातीची लोकसंख्या या विषयावर

ISBN-978-93-83672-72-1


सदरील शोधनिबंध आधारित आहे. बिदर जिल्ह्यातील अनुसूचित जाती जमातीची लोकसंख्या खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे

तक्ता क्र.१

बिदर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व जमातीची तालुकानिहाय लोकसंख्या (सन २०११)

| अ.क्र. | तालुके | एकुण लोकसंख्या | अनुसूचित जाती-जमातीचे एकुण लोकसंख्येतील प्रमाण | |
|---|---|---|---|---|
| | | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
| १ | बसवकल्याण | ३४५२४७ | ७५९९५ (२२.०१%) | ६२८१० (१८.१९%) |
| २ | भालकी | २७७३५० | ७०१६६ (२५.२९%) | २९००१ (१०.४५%) |
| ३ | औराद | २७८४०० | ८८६८३ (३१.८५%) | ३०५८२ (१०.९८%) |
| ४ | बिदर | ४६११४१ | ८८७५२ (१८.८८%) | ५६४८८ (१२.०२%) |
| ५ | हुमनाबाद | ३३२३६२ | ७६१८१ (२२.९२%) | ५६१३३ (१७.१२%) |

स्रोत : भारतीय जनगणना अहवाल, कर्नाटक राज्य सिरीज ३०







ISBN-978-93-83672-72-1

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, जिल्ह्यात अनुसूचित जातीची लोकसंख्या औराद तालुक्यात सर्वात जास्त ८८६८३ (३१.८५%) दिसून येते. तर सर्वात कमी अनुसूचित जातीची लोकसंख्या बिदर तालुक्यात ८८७५२ (१८.८८%) दिसून येते. तसेच बिदर जिल्ह्यातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या पाहिल्यास सर्वात जास्त लोकसंख्या बसवकल्याण तालुक्यात ६२८१० (१८.१९%) आहे. तर सर्वात कमी अनुसूचित जमातीची लोकसंख्या भालकी तालुक्यात २९००१ (१०.४५%) इतकी दिसून येते.

**निष्कर्ष :**

बिदर जिल्ह्यातील सन २०११ च्या जनगणनेनुसार एकुण लोकसंख्या पाहता १७०३३०० एवढी असून त्यापैकी जातीनिहाय लोकसंख्येचे प्रमाण तालुकानिहाय वेगवेगळे आहे. बिदर जिल्ह्यात अनुसूचित जातींची तालुकानिहाय लोकसंख्या पाहता औराद ३१.८५%, भालकी-२५.२९%, हुमनाबाद-२२.९२%, बसवकल्याण-२२.०१%, बिदर-१८.८८% एवढी आहे. तर बिदर जिल्ह्यात अनुसूचित जमातींची तालुकानिहाय लोकसंख्या पाहता बसवकल्याण-१८.१९%, हुमनाबाद-१७.१२%, बिदर-१२.०२%, औराद-१०.९८%, भालकी-१०.४५% एवढी आहे.

संदर्भ

१) भारतीय जनगणना अहवाल, कर्नाटक राज्य सिरीज ३०
२) बिदर जिल्हा गॅझेटिअर
३) बिदर जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन
४) www.googleearth.world, India, Karnataka, Bidar
५) www.bidar.nic.in

( Dr. Haridas Ra...
Principal
Gramin Arts, Comm. & Science
Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal)
Tq. Mukhed Dist. Nanded (M.S)